# सुशासन

## (तत्वे आणि पद्धती)




संपादक

**डॉ. नितीन गौरखेडे**

**डॉ. मुक्ता सोमवंशी**

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

# सुशासन

( तत्त्वे आणि पद्धती )

■ डॉ. नितीन गौरखेडे
डॉ.मुक्ता सोमवंशी

■ प्रथम आवृत्ती – २५ , डिसेंबर २१)

© प्रकाशक व संपादक

■ प्रकाशक

आधार पब्लिकेशन, अमरावती.
हनुमान मंदिराजवळ, पाठ्यपुस्तक मंडळा समोर,
वि.म.वि.कॉलेज मागे, अमरावती
मो. ९५९५५६०२७८
email- aadharpublication@gmail.com

■ मुखपृष्ठ संकल्पना
विलास पवार
सरिता ग्राफिक्स, अमरावती

■ अक्षरजुळवणी
सरिता ग्राफिक्स,
कठोरा रोड, अमरावती

■ Price : 400/-

ISBN- 978-93-91305-63-5

सुचना:- सदर अंकामध्ये प्रकाशित झालेल्या लेखास, संपादक, प्रकाशक, मालक, मुद्रक जबाबदार राहणार नाही. या अंकामध्ये प्रकाशित झालेले लेख लेखकाचे त्यांचे वैयक्तिक मत आहे.

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

## संपादकीय

'सुशासन - तत्त्वे आणि पद्धती' या प्रस्तुत ग्रंथाचे संपादन करताना आम्हाला मनस्वी आनंद होत आहे. सुशासन हे नागरिकांच्या उत्तम जीवनमानाशी निगडित आहे. लोकशाही वातावरणात कार्यक्षम व प्रभावी प्रशासनाची हमी देणे म्हणजे सुशासन होय. लोकशाहीची वाढती कार्यक्षम आणि खुले प्रशासन, सार्वजनिक आणि खाजगी क्षेत्रातील स्पर्धा तसेच बाजारपेठांसह एक वैध राज्य म्हणूनही सुशासनाकडे पाहिले जाते. स्वतंत्र न्यायपालिका, निःपक्षपातीपणा, समानतेवर आधारित कायदे आणि कायद्याचे अधिराज्य ही सुशासनाची वैशिष्ट्ये विविध आंतरराष्ट्रीय संस्थांनी मांडलेली आहेत.

सुशासन म्हणजे समाजाच्या गरजा अपेक्षा पूर्ण करणारे प्रशासन होय. जनतेच्या या अपेक्षा पूर्ण करण्यासाठी स्वीकार्यता आणि सक्षम सार्वजनिक सेवा, उत्तरदायी निर्णयव्यवस्था या आधारे राजकीय संस्थांनी समाजात विविध हितसंबंध गुंतवून सर्वसाधारण जनकल्याणास प्रभावीपणे प्रोत्साहित करणे, मजबूत नागरी समाजाचे महत्त्व यावर भर देणे; सार्वजनिक क्षेत्रात सुधारणा करण्याकरिता अर्थसंकल्पीय अनुशासनाला बळकटी देणे, गैरसरकारी संघटनांचा वापर करणे, सामाजिक उद्दिष्टे, न्याय आणि पर्यावरणीय संरक्षणासह इतर संघटनांचा वापर करणे महत्त्वाचे ठरते.

जागतिक बँकेने १९९२ मध्ये प्रसिद्ध केलेल्या 'शासन प्रक्रिया व विकास' या अहवालात असे स्पष्ट केले आहे की, "शासन ही निरंतर चालणारी प्रक्रिया आहे. शासनास अपेक्षित दिशा देता येते. सुशासनासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात. शासनाने

नागरिकांच्या मागण्याना योग्य प्रतिसाद दिला पाहिजे. तसेच नागरिकांनी सुशासनाची मागणी केली पाहिजे." भारतामध्ये सुशासनाच्या संदर्भात माहितीचा अधिकार, नागरिकांची सनद, आधार, मनरेगा अशा योजना आणि धोरणांच्या माध्यमातून सुशासनाच्या दिशेने महत्त्वाची पावले टाकलेली दिसतात. तसेच भारतीय राज्यघटनेच्या उद्देश पत्रिकेचे वाचन व आकलन केले असता असा बोध होतो की, या उद्देशपत्रिकेचे लिखाण सुशासन डोळयासमोर ठेवूनच केले आहे.

वास्तविकत: 'सुशासन' ही संकल्पना नवीन आहे, असे नव्हे. कारण प्राचीन काळापासूनच उत्तम शासनाविषयी विचारवंतांनी मते मांडली आहेत. प्लेटो यांच्या 'तत्वज्ञ राजा' या संकल्पनेतून आजच्या सुशासनाचाच बोध होतो. तसेच कौटिल्यांनी 'राजा' विषयी जी मते मांडली आहेत, ती सुद्धा सुशासन प्रस्थापित करणारीच आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांचे 'रयतेचे राज्य' हे देखील सुशासनाचे उत्तम उदाहरण आहे. महात्मा गांधीजींनी 'रामराज्य' किंवा 'ग्रामराज्य' ही संकल्पना सुशासनाच्या दृष्टिकोनातूनच मांडली आहे. असे असले तरी 'सुशासन' या संकल्पनेविषयी हवे तेवढे लिखाण झालेले दिसत नाही. म्हणून विविध विचारवंत, संशोधक यांच्याकडून सुशासना विषयीच्या शोधनिबंधांना एकत्रित करून अभ्यासकांना, तसेच उद्याच्या पिढीला एक उत्तम संदर्भग्रंथ देण्याच्या उद्देशाने हा ग्रंथ संपादित करण्यात आला आहे.

सुशासन 'तत्वे आणि पद्धती' या प्रस्तुत संपादित ग्रंथाकरिता शोधनिबंध पाठविणारे प्राध्यापक, संशोधक व लेखक यांचे मोलाचे सहकार्य लाभले आहे. त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त करणे आम्ही आमचे कर्तव्य समजतो. आमचे मार्गदर्शक माजी आमदार व्यंकटराव कदम साहेब तसेच आम्हाला सतत प्रेरणा देणारे श्री. परमेश्वररावजी कदम साहेब (अध्यक्ष, हनुमान शिक्षण प्रसारक मंडळ, सोनपेठ) आणि मा. डॉ. नितीन कोल्हटकर. (अध्यक्ष, स्वामी विवेकानंद बहुउद्देशिय विकास शिक्षण संस्था, रोहणा) आमच्या महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. वसंत सातपुते, प्राचार्य डॉ. नितीन माथनकर, आमचे गुरुवर्य डॉ. अजय पाटील (प्राचार्य, श्रीमती सुशीला देवी महाविद्यालय, लातूर) यांचे प्रोत्साहन अत्यंत बहुमूल्य आहे. आमच्या महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचारी यांचे सहकार्य ही फार महत्त्वाचे आहे. प्रस्तुत ग्रंथाचे प्रकाशन करण्यासाठी ज्यांनी मला विशेष सहयोग करणारे माझे प्राध्यापक बंधू डॉ. संदीप काळे (राज्यशास्त्र विभाग प्रमुख, यशवंत महाविद्यालय, सेलू जि. वर्धा) यांचे ऋण न मानता त्यांच्या ऋणात राहणे अधिक योग्य समजतो. प्रस्तुत ग्रंथाचे प्रकाशक प्रा. विराग एस. गावंडे सर ( संचालक, आधार पब्लिकेशन, अमरावती) यांच्या सहकार्याशिवाय हा ग्रंथ प्रकाशित करणे अशक्य होते. प्रस्तुत ग्रंथाच्या संपादन प्रक्रियेत सहकार्य करणाऱ्या सर्व मान्यवर संशोधक, प्राध्यापक आणि स्नेहीजणांचे मनःपूर्वक आभार !!

**दिनांक : २५ डिसेंबर २०२१ ( सुशासन दिन )**

**संपादक**

**डॉ. नितीन डी. गौरखेडे**

**डॉ. मुक्ता गो. सोमवंशी**

Late Ramesh Warpudkar ACS College
Sonpeth
Pin-431516
Ta.Sonpeth Dist.Parbhani

PRINCIPAL
Late Ramesh Warpudkar (ACS)
College, Sonpeth Dist. Parbhani